स्थानिक पूरक भत्ता व घरभाडे भत्ता
प्रयोजनासाठी वर्गीकृत शहरे/गावे यांचे
पुनर्वर्गीकरण .....

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक स्थाभ. १०९३/७६/सेवा-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २ सप्टेंबर, १९९३.

पहा:- [१] शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वेपूर. १२८७/६४३/सेवा-१०, दि. २५ एप्रिल, १९८८.
[२] शासन शुद्धिपत्र वित्त विभाग क्र. घाभाअ. १०९०/प्र.क्र. २३४/सेवा-५, दिनांक १४ जानेवारी, १९९१.

शासन निर्णय
==========

स्थानिक पूरक भत्ता व घरभाडे भत्ता अनुज्ञेयतेसाठी शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेपूर. १२८७/६४३/सेवा-१०, दिनांक २५ एप्रिल १९८८ सोबत "जोडपत्र-१ अ" व "जोडपत्र-१ ब" मध्ये वर्गीकृत शहरे/गावे यांची यादी दिली आहे. या यादीत सन १९९१ च्या जनगणनेच्या आधारे सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन असा आदेश देत आहे की, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेपूर. १२८७/६४३/सेवा-१०, दिनांक २५ एप्रिल, १९८८ सोबतचे "जोडपत्र-१ अ" व "जोडपत्र-१ ब" रद्द समजण्यात यावीत. त्याऐवजी आता, त्या शासन निर्णयासोबतची सुधारित "जोडपत्र-१ अ" व जोडपत्र-१ ब" सोबत दिल्याप्रमाणे असतील. तसेच शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेपूर. १२८७/६४३/सेवा-१० दिनांक २५ एप्रिल १९८८ मधील स्थानिक पूरक भत्ता अनुज्ञेयतेसाठीच्या तक्ता क्रमांक १ मधील वर्गीकरणात विनिर्दिष्टपणे दर्शविण्यात आलेल्या शहरांच्या नावामध्ये सोबतच्या "जोडपत्र-१अ" वर्गीकरणानुसार बदल करण्यात आला आहे असे समजले जावे.

३. शासन असाही आदेश देत आहे की, या शासन निर्णयान्वये घरभाडे भत्याच्या प्रयोजना-साठी "क" वर्ग शहर म्हणून कामठी [ना.क्षे.] च्या पुनर्वर्गीकरणानंतरही कामठी नागरी समूह क्षेत्रातील कामठी [एम] व कामठी [छावणी] या भागातील कार्यालयात काम करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना "ब-१" दर्जाच्या शहराप्रमाणे पुढील आदेश होईपर्यंत स्थानिक पूरक भत्ता व घरभाडे भत्ता मिळत राहील. परंतु कामठी नागरी समूह क्षेत्रातील [१] कन्हान पिंपरी [सि.टी.], [२] कान्द्री [सी.टी.], [३] टेकाडी [सी.टी.] या भागातील शासकीय कर्मचाऱ्यांना "क" वर्ग शहराप्रमाणे घरभाडे भत्ता अनुज्ञेय असेल. स्थानिक पूरक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

४. शासन असाही आदेश देत आहे की, सर्व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्थांतील प्राथमिक, माध्यमिक शाळांतील पूर्णकालिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच कृषि व कृषिेतर विद्यापीठांतील व तत्संलग्न महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, त्याचप्रमाणे शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक मभवा. ११८६/२२४/सेवा-१०, दिनांक १८ ऑगस्ट, १९८६ मधील परिच्छेद ६ मध्ये उल्लेखिलेले इतर कर्मचारी ह्यांना सध्याची स्थानिक पूरक भत्त्याची व घरभाडे भत्त्याची योजना लागू असल्यास त्यांना सदरहू आदेश लागू असतील.

५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ [सन १९६२ चा अधिनियम, क्रमांक ५] च्या कलम २४८ च्या पोटकलमान्वये प्रदान केलेले अधिकार व त्या संबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करून शासन असाही आदेश देत आहे की, जिल्हा परिषदांच्या पूर्णकालिक कर्मचाऱ्यांनासुध्दा हे आदेश योग्य त्या फेरफारांसह लागू करण्यात यावेत.

६. संबंधित विभागीय प्रमुखांनी सदरहू आदेश, सर्व संबंधित संस्थांच्या व्यवस्थापनांच्या निदर्शनास आणून द्यावेत आणि कर्मचाऱ्यांना नियमानुसार स्थानिक पूरक भत्ता व घरभाडे भत्ता दिला जाईल याची खात्री करून घ्यावी. शासनाने वेळोवेळी मंजूर केलेल्या सहाय्यक अनुदान नियमांनुसार या भत्त्यांसाठी सहायक अनुदान अनुज्ञेय ठरेल असे त्यांनी व्यवस्थापनांना कळवावे.